जनसामान्यांच्या मनातील आरसा

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | बुधवार
२६.०८.२०२६

# वरुड दर्पण

संपादक - चंद्रकांत भा. भड

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: २०७ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

+91 7745067712

## चॉकलेटचे आमिष दाखवून तीन वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार

### आरोपी फरार, पहाटेच्या सुमारास गुन्हा दाखल



■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**नांदेड** – राज्यातील महिला आणि लहान मुलींवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याचं दिसून येते आहे. नगरापूरच्या घटनेनं अवघा महाराष्ट्र हादरला होता, त्यानंतरही चिमुकल्यांवरील अत्याचाराच्या घटना पुढे येत आहेत. नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यातील सोनखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका तीन वर्षीय चिमकुलीवर अत्याचार केल्याचा संतापजनक घटना उघडकीस आली आहे. येथील एका गावात तीन वर्षांच्या चिमुकलीवर चॉकलेटचे आमिष दाखवून अत्याचार केल्याची घटना समोर आली. या प्रकरणी पीडित बालिकेच्या आईच्या फिर्यादीवरून सोनखेड पोलिसांनी मंगळवारी (२५ ऑगस्ट) पहाटे गुन्हा दाखल केला असून, फरार आरोपीचा कसून शोध सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी (२४ ऑगस्ट) सायंकाळी पीडित चिमुकली घरासमोरील अंगणात खेळत होती. त्याचवेळी शेजारी राहणाऱ्या नातेवाईक व्यक्तीने तिला चॉकलेट देण्याचे आमिष दाखवून सोबत नेले. साधारण २० ते २५ मिनिटांनंतर तो मुलीला पुन्हा घरी सोडून निघून गेला. चिमुकली नात्याने त्या आरोपीला 'बाबा' अशी हाक मारायची. मुलीला दुखापत झाल्याचे निदर्शनास येताच पालकांनी तिला तातडीने नांदेड येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. सध्या तिच्यावर डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू असून तिची प्रकृती स्थिर असल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच सोनखेड पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. पीडितेच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून पहाटे तीनच्या सुमारास संशयिताविरुद्ध पोक्सो व अन्य संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेनंतर आरोपी फरार झाला असून, पोलीस पथके त्याचा शोध घेत आहेत. या अमानुष कृत्यामुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

## आदिवासी विद्यार्थ्यांचे उपोषण १३ व्या दिवशीही तीव्र

### आंदोलकाची प्रकृती चिंताजनक, राहुल गांधींचे थेट मुख्यमंत्र्यांना पत्र

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**पुणे** – पुण्यातील मांजरी येथे आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आदिवासी विद्यार्थ्यांनी गेल्या १३ दिवसांपासून सुरू असलेल्या आंदोलनामुळे वातावरण तापले असून उपोषणकर्त्या विद्यार्थ्यांची प्रकृती वेगाने खालावत चालली आहे.

दरम्यान, या गंभीर परिस्थितीची दखल घेत लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी थेट उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून या संवेदनशील प्रकरणात स्वतः पुढाकार घेण्याची आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्वरित तोडगा काढण्याची आग्रही मागणी केली आहे तर दुसरीकडे मागण्या मान्य न झाल्यास थेट मुंबईवर हल्लाबोल करण्याचा आणि सामूहिक




आत्मदहनाचा इशारा आंदोलक संतप्त विद्यार्थ्यांनी दिला आहे.

यापैकी यश पावरा नावाच्या विद्यार्थ्याची प्रकृती कमालीची बिघडल्यामुळे त्याला तात्काळ रुग्णवाहिकेतून रुग्णालयात हलवण्यात आले तर दुसऱ्या बाजूला 'दासवे' नावाच्या एका आंदोलक विद्यार्थ्याने डॉक्टरांनी गंभीर परिस्थितीचा इशारा दिला असतानाही रुग्णालयात दाखल होण्यास स्पष्ट नकार दिला. अत्यंत बिकट परिस्थितीतही, 'पुन्हा चक्कर येऊ शकते किंवा प्रकृती अधिक गंभीर होऊ शकते, तरीही मी स्वतःच्या जबाबदारीवर उपोषण सुरू ठेवत आहे,' असा लेखी संमती फॉर्म (कन्सेंट फॉर्म) लिहून देत हा विद्यार्थी आपल्या उपोषणावर ठाम राहिला आहे.

सामूहिक आत्मदहनाचा इशारा संतापलेल्या विद्यार्थ्यांनी 'आमच्या विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळू नका; जर आमच्या भावाला किंवा बहिणीला काही झाले, तर त्याला हे भाजप सरकार, आदिवासी विकास विभाग आणि मुख्यमंत्रीच जबाबदार असतील,' अशी तीव्र प्रतिक्रिया देत मागण्या मान्य न झाल्यास थेट मुंबईवर हल्लाबोल करण्याचा आणि सामूहिक आत्मदहनाचा इशाराही संतप्त विद्यार्थ्यांनी दिला आहे.

शब्दांचा खेळ करू नका! आदिवासी विकास मंत्र्यांनी वयाची अट रद्द किंवा शिथिल करण्याबाबत तोंडी घोषणा केली असली, तरी आंदोलक विद्यार्थ्यांनी ती पूर्णपणे फेटाळून लावली आहे. शासनाकडून केवळ 'शब्दांचा खेळ' केला जात असून अट 'रद्द' करण्याऐवजी 'शिथिल' किंवा तात्पुरती स्थगित करण्याचे सांगून दिशाभूल केली जात असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला.

## थोडक्यात

### उत्तर प्रदेश, बिहार निवडणुकांवर डोळा ठेवून आंदोलन : परिवहनमंत्री सरनाईक

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – 'उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये आगामी काळात होणाऱ्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून काही राजकीय नेते मुंबई आणि ठाण्यातील वातावरण खराब करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करत आहेत', असा खळबळजनक आरोप राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मंगळवारी केला. कोणत्याही चालकाला आतापर्यंत ५०० रुपयांचाही दंड ठोठावण्यात आलेला नसताना, २० ते २५ हजार रुपयांचा मोठा दंड आकारला जात असल्याच्या अफवा पसरवून समाजात हिंदी विरुद्ध मराठी असा अनावश्यक विवाद निर्माण केला जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## मराठा-कुणबी वंशावळ समित्यांना पुन्हा एक वर्षाची मुदतवाढ : अपूर्ण जुळवणी त्वरित पूर्ण करण्याचे निर्देश

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**मुंबई** – मराठा आरक्षणाच्या मुद्यावरुन पुन्हा एकदा राज्यातील वातावरण चांगलंच तापल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे पुन्हा एकदा २९ ऑगस्टपासून अंतरवाली सराटीत आंदोलनाला सुरुवात करणार आहेत. दरम्यान, त्यापूर्वी सरकाराने मराठा कुणबी प्रमाणपत्रासंदर्भात एक मोठं पाऊल उचलल्याची माहिती समोर आली आहे. कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्रासाठीच्या वंशावळ जुळवणी समितीला आणखी एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. अपूर्ण जुळवणी त्वरित पूर्ण करण्याचे निर्देश. मिळालेल्या माहितीनुसार, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्रासाठी वंशावळ जुळवण्याच्या प्रक्रियेसाठी तालुकास्तरावर तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीला मुदतवाढ देण्यात आली आहे.

## नारीशक्तीने रोखला शहापूर-मुरबाड-खोपोली महामार्ग

### प्रशासनाच्या निषेधार्थ खड्डेमय महामार्गावर साजरी केली मंगळागौर

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**शहापूर** – शहापूर-मुरबाड-पाटगाव-खोपोली महामार्गाच्या रखडलेल्या कामाचा आणि प्रशासनाच्या उदासीनतेचा निषेध करण्यासाठी नडगाव परिसरातील संतप्त महिलांनी मंगळवारी आक्रमक आंदोलन केले. मंगळागौरीच्या सणाच्या दिवशीच महिलांनी खड्डेमय महामार्गावर ठिय्या देत तब्बल तीन तास महामार्ग रोखून धरला. यावेळी महिलांनी पारंपरिक मंगळागौर खेळत एमएसआरडीसी प्रशासनाच्या निष्क्रियतेचा निषेध केला. या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक तीन तास विस्कळीत झाली होती. विशेष म्हणजे माहिती देऊनही आंदोलन स्थळी एमएसआरडीसीचा एकही अधिकारी उपस्थित न राहिल्याने महामंडळाचा रस्त्याच्या प्रश्नाकडे असलेला निष्काळजीपणा पुन्हा एकदा स्पष्ट झाला. यावेळी संतप्त महिलांनी आठ वर्षे रस्ता रखडला, तरी आमदार-खासदारांना नागरिकांच्या वेदना दिसत नाहीत का, असा सवाल करत तीव्र नाराजी व्यक्त केली.

## 'सीटीईटी' परीक्षा पुन्हा लांबणीवर, नव्यानं अर्ज नोंदणी प्रक्रिया सुरु

■ *(प्रतिनिधी वरुड दर्पण)*




**मुंबई** – शिक्षकांची आणखी किती परीक्षा पाहणार? असा प्रश्न आता राज्यातील शिक्षकांकडून विचारला जातोय.

राज्याची टीईटी पेपर फुटीनंतर लांबणीवर गेला असताना आता सीटीईटी परीक्षा सुद्धा पुढे ढकलली आहे. त्यामुळे या परीक्षा कधी घेणार? असा सवाल आता शिक्षकांकडून विचारला जातोय. राज्याची जून महिन्यात होणारी टीईटी परीक्षा पेपर फुटीनंतर लांबणीवर गेली असताना आता केंद्राची ६ सप्टेंबरला होणारी सीटीईटी परीक्षा सुद्धा पुढे ढकलली आहे. परिणामी, सीटीईटी परीक्षेसाठी नोंदणी न करता आलेल्या शिक्षकांना पुन्हा एकदा नोंदणी सुरू करण्याचा निर्णय घेऊन सीबीएसईने व्यापक विचार करून परीक्षा पुढे ढकल्याच सांगितलंय. मात्र, जे शिक्षक मागील अनेक महिन्यांपासून राज्याच्या टीईटीचा आणि केंद्राच्या टीईटीचा अभ्यास करत आहेत त्यांना मात्र या निर्णयामुळे मनस्ताप सहन करावा लागत असल्याची भावना आहे. नोकरी टिकवण्यासाठी टीईटी उत्तीर्ण होणे बंधनकारक, शिक्षक पुन्हा एकदा चिंतेत दरम्यान, एकीकडे पाच ते सहा तास शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना शिकवा, तर शाळा झाल्यानंतर टीईटी परीक्षेचा अभ्यास करा.

## नितीन गडकरी म्हणाले, 'आता जबाबदारी नव्या पिढीला देण्याची वेळ आली...' मी आता पूर्वी इतकं काम करू शकत नाही

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**मुंबई** – केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी 'नवीन पिढीकडे जबाबदारी सोपवण्या'बाबतच्या आपल्या वक्तव्यावर स्पष्टीकरण दिलं आहे.

गडकरींच्या कार्यालयाने म्हटले आहे की, 'त्यांनी आपल्या लक्ष्मणराव मानकर ट्रस्टशी संबंधित सामाजिक कार्याची जबाबदारी नवीन पिढीकडे सोपवण्याबद्दल भाष्य केले होते.' कार्यालयाने स्पष्ट केले की, त्यांच्या वक्तव्याचा कोणताही राजकीय संबंध नव्हता. गडकरींच्या वक्तव्याचा संबंध त्यांच्या राजकारणातील निवृत्तीशी जोडला होता. गडकरींचे हे वक्तव्य २३ ऑगस्ट रोजीचे होते. ते म्हणाले होते की, 'मी आता जास्त काम करू शकत नाही.

जेव्हा शक्य होते तेव्हा केले. जबाबदारी नवीन पिढीकडे सोपवली पाहिजे.' मी जास्त काम करू शकत नाही नितीन गडकरी गेल्या पाच दशकांहून अधिक काळ राजकारणात आहेत. ते गेल्या १२ वर्षांपासून मोदी सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री आहेत. त्यांच्याकडे रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाचा कार्यभार आहे.



# दादी प्रकाशमणी यांच्या पावन स्मृतिप्रित्यर्थ 'विश्वबंधुत्व रक्तदान अभियान २०२६' अंतर्गत रक्तदान शिबिर

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'विश्वबंधुत्व रक्तदान अभियान २०२६' अंतर्गत येथील शिवशक्ती भवन येथे राजयोगिनी दादी प्रकाशमणी यांच्या पावन स्मृतिप्रित्यर्थ रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराला शहरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या उपक्रमात एकूण ४६ रक्तदात्यांनी रक्तदान करुन मानवसेवेचा आदर्श घालुन दिला. यामध्ये महिला व पुरुष रक्तदात्यांचा उल्लेखनीय सहभाग होता. प्रजापिता ब्रह्माकुमारी संस्थेच्या माध्यमातून देशभरात सेवा, प्रेम, बंधुत्व आणि निःस्वार्थ समाजसेवेचा संदेश दिला जातो. त्याच भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरामागे ज्ञान, योग आणि निःस्वार्थ रक्तदानाच्या माध्यमातून संपूर्ण मानवतेला एकसूत्रात जोडणे, सेवा आणि विश्वबंधुत्वाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविणे, हा प्रमुख उद्देश होता. प्रत्यक्ष कृतीची जोड देत अनेक रक्तदात्यांनी या शिबिरात स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदविला. रक्तदान करण्यापूर्वी प्रत्येक रक्तदात्याची आवश्यक वैद्यकीय तपासणी करण्यात आली. रक्तदात्यांना रक्तदानाचे महत्त्व, त्यासंबंधीची आवश्यक काळजी तसेच रक्तदानामुळे समाजातील गरजू रुग्णांना होणारी मदत याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमास डॉ.मनोहर आंडे, डॉ.चरण सोनारे, डॉ.मीना बंदे, पत्रकार दीपक खंडेलवाल यांची विशेष उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी रक्तदात्यांचे कौतुक करून नियमित रक्तदानाचे सामाजिक व मानवी जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. नागरिकांनी पुढेही अशा सेवाभावी उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन सेंटर प्रमुख बिंदू दीदी यांनी केले. सहाय्यक भारती दीदी आणि करुणा दीदी यांनी कार्यक्रमाच्या नियोजनात व व्यवस्थापनात मोलाची भूमिका बजावली. शिबिरासाठी अमरावती येथील डॉ.पंजाबराव देशमुख रक्तपेढीचे वैद्यकीय पथक विशेषतः येथे आले होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वरुड सेंटरला नियमित येणारे डॉ.दयाराम शेंबेकर, विजय गुल्हाने, भागवत आंडे, महेश बोरकुटे, बी.के.निळकंठ बेलसरे, बंडू पैठणकर, प्रमोद केणे, विनोद भोंगाडे, श्रीकांत रत्नपारखी, राजेश खासबागे, नारायण ठाकरे, अरुण बेले, डॉ.प्रकाश आगरकर, अंकुश राऊत यांचे विशेष सहकार्य लाभले. समारोपप्रसंगी रमेश कोरडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. राजयोगिनी दादी प्रकाशमणी यांच्या पावन स्मृतींना अभिवादन करत, त्यांच्या सेवा, प्रेम वक्ष विश्वबंधुत्वाच्या संदेशाला कृतीत उतरविणारा हा रक्तदानाचा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी व यशस्वी ठरला.

# सोमठाना खुर्दच्या लाभार्थ्यांना मोबदल्यासाठी आवाहन

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत सोमठाना खुर्द येथील ४२ शेतमुल्यांकनधारक, २१ वनहक्कधारक आणि ११२ घरमुल्यांकनधारकांकरिता निधी उपलब्ध झाला असून काही लाभार्थ्यांना मोबदला रक्कम वितरीत करण्यात आली आहे. आवश्यक दस्तऐवजा अभावी उर्वरित लाभार्थ्यांना मुल्यांकन रक्कम अदा करण्यास अडचण येत आहे, अशा लाभार्थ्यांना अकोट वन्यजीव विभाग अकोट येथे तातडीने दस्तऐवज सादर करण्याचे आवाहन, अकोट वन्यजीव विभागाचे उपवनसंरक्षक आर.एस.टोलिया यांनी केले आहे.

वर्ष २०१२ च्या शासन निर्णयानुसार सोमठाना खुर्द या गावाचे पुनर्वसन करण्यात आले आहे. या गावातील शेतमुल्यांकनधारक आणि वनहक्कधारकांना मुल्यांकनाची ४ पट रक्कम देय असून यातील १ पट मुल्यांकन रक्कम व त्यावरील ३० टक्के दिलासा रक्कम वजा करून उर्वरीत मोबदला रक्कम अदा करण्याची प्रक्रिया सुरु आहे. परंतु काही शेतमुल्यांकनधारक, वनहक्कधारक आणि घरमुल्यांकनधारकांनी आवश्यक दस्तऐवज सादर नकेल्याने त्यांना मोबदला अदा करण्यात अडचण येत आहे. शेतमुल्यांकनधारक आणि वनमुल्यांकनधारकांनी अकोट येथे सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# त्रिमूर्ती ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेची सर्वसाधारण सभा

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)



**जरुड** – त्रिमूर्ती ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मोठा मारुती देवस्थान सभागृह येथे उत्साहात संपन्न झाली.

याप्रसंगी सभेच्या प्रास्तविक भाषणातून किरण शेरेकर यांनी पतसंस्थेच्या बाबतीत प्रगतीचा आढावा सभेसमोर सादर केला. उपाध्यक्ष सुधाकर मानकर व संचालक नईम शेख जरुडकर यांनी सभासदांना पतसंस्थेसोबत व्यवहार वाढवणे, ठेवी ठेवणे, कर्जाची वेळेवर परतफेड करणे याबाबतीत संस्थेच्या हितचिंतक सभासदांना भाषणातुन आवाहन केले.

याप्रसंगी वरुड तालुका सरकारी निमसरकारी कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे संचालक गजानन देशमुख तसेच सुषमा मानेकर यांनी सभेला मार्गदर्शनपर संबोधित केले. सभेमध्ये वार्षिक अहवाल वाचन व्यवस्थापक अंकुश टोंगसे यांनी केले. याप्रसंगी वेळेवर कर्ज परतफेड करणाऱ्या नियमित कर्जदार सभासदांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्याचा पायंडा संस्थेने सुरु केला असून याबद्दल सुधाकर भुते, साहेबराव शेंदरकर, विजय घोरमाडे हे सत्काराचे मानकरी ठरले. पतसंस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव वानखडे यांनी पतसंस्थेच्या प्रगतीचा आढावा आणि पतसंस्थेबद्दलचा विश्वास अध्यक्षीय भाषणातुन संस्थेच्या सर्व सभासदांमध्ये निर्माण केला आणि सर्व हितचिंतक, सभासद व संचालक मंडळाच्या सहकार्याने या पतसंस्थेची वाटचाल उत्तरोत्तर प्रगतीकडे होत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन विठ्ठलराव सदाफळे यांनी तर आभार रोशन वानखडे यांनी मानले. सभेच्या यशस्वितेकरिता पतसंस्थेचे सर्व कर्मचारी तसेच संचालक मंडळ व हितचिंतकांचे सहकार्य लाभले.

# खरीप हंगामासाठी जिल्ह्यात खतांचा पुरवठा सुरळीत

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – खरीप हंगामासाठी जिल्ह्यात खतांचा पुरवठा सुरळीत झाला असून १२ ऑगस्ट २०२६ पर्यंत ३४ हजार ४६२ मेट्रीकटन (मे.ट.) युरिया, १० हजार २७० मे. ट. डिएपी, ५ हजार ३७४ मे.ट. एमओपी, ४५ हजार ७९९ मे.ट. संयुक्त खते आणि २० हजार ५२६ मे.ट. एसएसपी खतांचा पुरवठा झाल्याचे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी सांगितले असून युरीया व डिएपी खतांच्या तुटवडयाबाबत वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित वृत्तांबाबत अधिकृत स्पष्टीकरण दिले आहे.

खरीप हंगामात खतांच्या अनधिकृत दरवाढीबाबत जिल्ह्यात आजपर्यंत कोणतीही लेखी तक्रार प्राप्त झाली नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

जिल्ह्यात एप्रिल महिन्यात खतांच्या रॅक लागण्यास विलंब झाला मात्र लवकरच पुरवठा सुरळीत करण्यात आला. रासायणीक खतांच्या किमंतीत कोणतीही वाढ झाली नाही. विशेषत: केंद्र शासन युरीयाच्या किंमती नियंत्रीत करीत असल्याने त्याच्या किंमतीत दरवाढ झालेली नाही तसेच डिएपीच्या किमंतीत वाढ नाही. फोस्फेटिक आणि पोटॅशिक खतांच्या बाबतीत केंद्र शासनाचे पोषणतत्व आधारीत अनुदान लागु असल्याने किंमतीत वाढ झाली नाही.

## सुंदरलाल बहुगुणा यांचा स्मृती दिन 'वृक्ष कृतज्ञता दिवस' म्हणुन साजरा करण्याच्या

# खासदार अमर काळे यांच्या मागणीला केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांचा सकारात्मक प्रतिसाद

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

***नवी दिल्ली*** – पर्यावरण संवर्धनासाठी आणि वृक्षांचे जतन करण्यासाठी चिपको आंदोलनाचे प्रणेते, थोर पर्यावरणवादी स्व.सुंदरलाल बहुगुणा यांच्या स्मृती प्रित्यर्थ दरवर्षी २१ मे हा दिवस राष्ट्रीय स्तरावर 'वृक्ष कृतज्ञता दिवस' म्हणून साजरा करण्यात यावा, अशी मागणी वर्धा लोकसभेचे खासदार अमर शरदराव काळे यांनी केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाकडे पत्राद्वारे केली होती. या मागणीवर केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी सकारात्मक दखल घेत खासदार अमर काळे यांना अधिकृत पत्र पाठवून कौतुक केले आहे.

खासदार अमर काळे यांनी दिनांक ३१ जुलै २०२६ रोजी केंद्रीय मंत्र्यांना पत्र लिहून २१ मे हा दिवस राष्ट्रीय स्तरावर 'वृक्ष कृतज्ञता दिवस' म्हणून घोषित करण्याची विनंती केली होती. वृक्षांचे मानवी जीवनातील, पर्यावरणातील, मृदा व जल संरक्षणातील तसेच कार्बन शोषणातील महत्त्व ओळखून नागरिकांमध्ये



जनजागृती निर्माण व्हावी, हा या मागणीमागील मुख्य उद्देश होता.

खासदार काळे यांच्या या पत्राला उत्तर देताना केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांनी नमूद केले की, 'खासदार अमर काळे यांनी मांडलेला विचार अतिशय स्तुत्य आणि विचारपूर्वक आहे. वृक्षांचे पर्यावरण संतुलन, जैवविविधता संरक्षण आणि हवेची गुणवत्ता सुधारण्यातील योगदान अमूल्य आहे.'

मंत्रालयाकडून आधीच आंतरराष्ट्रीय वन दिवस, विश्व पर्यावरण दिवस यांसारखे उपक्रम राबवले जातात. तसेच 'एक पेड माँ के नाम' या मोहिमेद्वारे नागरिकांमध्ये वृक्षांप्रती भावनात्मक जोड निर्माण केली जात आहे. अशा पार्श्वभूमीवर, स्व. सुंदरलाल बहुगुणा यांच्या स्मृतीस अभिवादन म्हणून २१ मे रोजी 'वृक्ष कृतज्ञता दिवस' साजरा करण्याच्या खासदार अमर काळे यांच्या सूचनेची दखल घेण्यात आली असून, या मागणीवर मंत्रालय योग्य तो सकारात्मक विचार करेल, असे आश्वासन केंद्रीय मंत्र्यांनी पत्राद्वारे दिले आहे.

खासदार अमर शरदराव काळे यांनी घेतलेल्या या पुढाकारामुळे पर्यावरणप्रेमींमधून आनंद व्यक्त केला जात असून, आगामी काळात २१ मे हा दिवस राष्ट्रीय स्तरावर 'वृक्ष कृतज्ञता दिवस' म्हणून साजरा होण्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

## कृषी पर्यटन केंद्र संचालकांची 'मामाचं वावर' येथे

# एक दिवसीय कार्यशाळेला उत्स्फुर्त प्रतिसाद

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अमरावती** – पर्यटन संचालनालय प्रादेशिक, अमरावती अंतर्गत अमरावती व छत्रपती संभाजीनगर विभागातील कृषी पर्यटन केंद्र संचालकांसाठी १८ ऑगस्ट २०२६ रोजी 'मामाचं वावर' कृषी पर्यटन केंद्र, मौजे वळती, ता. चिखली, जि. बुलढाणा येथे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला अमरावती व छत्रपती संभाजीनगर विभागातील विविध जिल्ह्यांतून आलेले कृषी पर्यटन केंद्र संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शक म्हणून पर्यटन संचालनालय प्रादेशिक कार्यालयाचे उपसंचालक विजय जाधव, शाश्वत विकास केंद्रचे गणेश चौधरी, कृषी पर्यटन केंद्र संचालक समितीचे अध्यक्ष लहू अवताडे आणि कॅनव्हास फाउंडेशन, द चॅरिटेबल ट्रस्टचे आशिष शेरेकर उपस्थित होते.

या कार्यशाळेत उपसंचालक विजय जाधव यांनी महाराष्ट्राचे पर्यटन धोरण २०२४ अंतर्गत कृषी पर्यटन, साहसी पर्यटन, प्रोत्साहन, होमस्टे, पर्यटन व्हिला, व्हॅकेशन होम अशा अधिकृत नोंदणी प्रक्रिया आणि कृषी पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा आर्थिक विकास कसा साधता येईल, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच आजच्या डिजिटल युगात ए.आय चा वापर कसा करता येईल यावरही त्यांनी प्रकाश टाकला. गणेश चौधरी यांनी कृषी पर्यटन केंद्र चालवताना निसर्गाचा समतोल राखून शाश्वत विकासाची कास कशी धरावी आणि स्थानिक संसाधनांचा प्रभावी वापर कसा करावा, याबद्दल तांत्रिक व व्यावहारिक माहिती दिली. अध्यक्ष लहू अवताडे यांनी राज्यातील कृषी पर्यटनासमोरील आव्हाने, संचालकांचे संघटन आणि पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी व्यावसायिक दृष्टिकोन कसा असावा, यावर आपले अनुभव अभ्यासपूर्ण रितीने मांडले.

# अमडापुरच्या स्मशानभुमित आज 'महाकाल' मुर्तीची भव्य प्राणप्रतिष्ठा व रक्तदान शिबिर



■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – तालुक्यातील अमडापूर येथील स्मशानभूमी परिसरात 'महाकाल' मूर्तीची भव्य प्राणप्रतिष्ठा सोहळा उद्या २६ ऑगस्ट रोजी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे. या धार्मिक सोहळयासोबतच सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान शिबिर आयोजीत करुन रक्तदात्यांना नि:शुल्क हेल्मेटचे वितरण आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या धार्मिक सोहळ्याची सुरुवात सकाळी ७ वाजता अमडापुर येथील हनुमान मंदिर येथून निघणाऱ्या भव्य शोभायात्रेने होईल. वाजत गाजत आणि भजनांच्या गजरात ही शोभायात्रा अमडापूर स्मशानभूमी परिसरात पोहोचेल, जिथे महाकाल मूर्तीची शास्त्रोक्त पद्धतीने प्राणप्रतिष्ठा केली जाईल. धार्मिक विधींसोबतच समाजाप्रती असलेले उत्तरदायित्व ओळखुन सकाळी ९ वाजता रक्तदान शिबिरात रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांना निःशुल्क हेल्मेटचे वितरण करण्यात येणार आहे. रक्तदान हे सर्वोत्तम आणि श्रेष्ठ दान मानले जाते. एका व्यक्तीने केलेले रक्तदान हे अपघातातील रुग्ण, शस्त्रक्रिया होणारे रुग्ण किंवा रक्ताशी संबंधित आजारांनी ग्रस्त असलेल्या गरजू रुग्णांचे प्राण वाचवू शकते. आपल्या रक्ताचा एक थेंब कोणासाठी तरी नवसंजीवनी ठरू शकतो. त्यामुळे नागरिकांनी, विशेषतः युवक वर्गाने या रक्तदान शिबिरात उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. तसेच, रस्ते अपघातांचे वाढते प्रमाण लक्षात घेता वाहनचालकांच्या सुरक्षेसाठी आणि रस्ते सुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी नि:शुल्क हेल्मेटचे वितरण सुद्धा करण्यात येणार आहे. प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानंतर दुपारी १ वाजता भाविकांसाठी भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व धार्मिक व सामाजिक उपक्रमांना अमडापूर आणि परिसरातील सर्व नागरिक, महिला व युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन भागवत सप्ताह समिती, समस्त ग्रामवासी, सर्व भजनी मंडळ व युवक मित्र मंडळ अमडापूरच्या वतीने करण्यात आले आहे.

गेल्या अनेक दिवसांपासुन अमडापुर वासिय नागरिक उत्कृष्ट स्मशानभुमिसाठी अथक परिश्रम घेत असून त्याचाच एक भाग म्हणजे उद्याचा सोहळा असल्याचे बोलेल्या जात आहे?

# संपादकीय

**प्रयत्न सोडू नका, यश आणि उद्याची सकाळ तुमचीच आहे**

## पावसाची दडी आणि शेतकऱ्यांची वाढती चिंता

पावसाळा सुरू झाला की शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित होतात. आभाळाकडे डोळे लावून बसलेला शेतकरी पावसाच्या प्रत्येक सरीकडे आपल्या भवितव्याची आशः म्हणून पाहतो. मात्र यंदा अनेक भागांत पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत दिवसेंदिवस वाढ होत आहे. सुरुवातीला झालेल्या पावसाच्या आधारावर शेतकऱ्यांनी पेरणी केली परंतु त्यानंतर पावसाने ओढ दिल्याने पिकांची वाढ खुंटण्याची भीती निर्माण झाली आहे. हिरवीगार दिसणारी शेती आता पावसाच्या प्रतीक्षेत आहे.

शेतकऱ्यांसाठी पाऊस म्हणजे केवळ पाणी नाही, तर संपूर्ण वर्षाच्या आर्थिक नियोजनाचा आधार आहे. पेरणीपासून कापणीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर पावसाची भूमिका महत्त्वाची असते. कपाशी, सोयाबीन, तूर, मका यांसारख्या पिकांना योग्य वेळी आवश्यक तेवढा पाऊस मिळणे अत्यंत गरजेचे आहे. पावसाने दीर्घ विश्रांती घेतल्यास जमिनीतील ओलावा कमी होतो आणि पिकांवर त्याचा थेट परिणाम होतो. परिणामी उत्पादन घटण्याची शक्यता निर्माण होते. विशेषतः कोरडवाहू शेतकऱ्यांची परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. विहीर, बोअरवेल किंवा सिंचनाची सुविधा नसलेल्या शेतकऱ्यांचे संपूर्ण पीक आकाशातील पावसावर अवलंबून असते. पावसाने साथ सोडली तर त्यांच्या हातात फारसे पर्याय उरत नाहीत. एकीकडे बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी, मशागत आणि डिझेलचे दर वाढले आहेत, तर दुसरीकडे पिकांच्या उत्पादनाची हमी नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या डोक्यावर कर्जाचा भार वाढण्याची शक्यता आहे.

आजचा शेतकरी हवामानाच्या लहरीपणाचा सर्वाधिक फटका सहन करत आहे. कधी अतिवृष्टी, कधी पावसाची दडी, तर कधी अवकाळी पाऊस अशा परिस्थितीत शेतीचे गणित पूर्णपणे विस्कटत आहे. हवामानातील बदल हे आता भविष्यातील संकट राहिले नसून शेतीसमोरील वर्तमानातील मोठे आव्हान बनले आहे. त्यामुळे पारंपरिक शेती पद्धतीसोबत हवामानाचा अंदाज, जलसंधारण, पीक विविधीकरण आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे आवश्यक झाले आहे.

पावसाने दडी मारली म्हणून केवळ शेतकऱ्यांनी चिंता करणे पुरेसे नाही. प्रशासनानेही परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्याची गरज आहे. पिकांची सद्यस्थिती, जमिनीतील ओलावा, पावसाचे प्रमाण आणि आगामी हवामानाचा अंदाज याचा नियमित आढावा घेऊन शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन मिळाले पाहिजे. कृषी विभागाने गावपातळीवर पोहोचून शेतकऱ्यांना पीक व्यवस्थापनाबाबत तातडीने सूचना देणे गरजेचे आहे.

पिकांचे नुकसान झाले तर नुकसानभरपाईची प्रक्रिया सोपी, पारदर्शक आणि वेगवान असली पाहिजे. पीकविमा योजना केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष संकटाच्या वेळी शेतकऱ्यांच्या मदतीला आली पाहिजे. विम्याची रक्कम मिळण्यासाठी शेतकऱ्यांना कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत. तंत्रज्ञानाच्या मदतीने नुकसान नोंदणी आणि पंचनाम्याची प्रक्रिया अधिक सुलभ करता येऊ शकते.

याचबरोबर जलसंधारणाकडे गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे. गावोगावी बंधारे, शेततळे, नाला खोलीकरण, गाळ काढणे आणि पावसाचे पाणी अडविण्याच्या उपाययोजना सातत्याने राबविल्या पाहिजेत. पाऊस कधी पडेल यावर आपले नियंत्रण नसले तरी पडलेले पाणी किती काळ जमिनीत टिकवून ठेवायचे, याचे नियोजन नक्कीच करता येते. ‘पाणी अडवा, पाणी जिरवा’ ही संकल्पना केवळ घोषवाक्य न राहता गावांच्या विकासाचा भाग बनली पाहिजे. शेतकऱ्यांना केवळ पावसाचीच नव्हे तर योग्य बाजारभावाचीही चिंता आहे. उत्पादन चांगले झाले तरी बाजारभाव मिळेल याची खात्री नसते आणि उत्पादन कमी झाले तर खर्चही भरून निघत नाही. त्यामुळे शेतीला शाश्वत आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी उत्पादन खर्च, बाजारभाव, साठवणूक, प्रक्रिया उद्योग आणि बाजारपेठ यांचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे. आज शेतकऱ्याच्या शेतात उभे असलेले पीक हे केवळ त्याचे पीक नाही; त्यामागे संपूर्ण कुटुंबाचे भविष्य उभे आहे. मुलांचे शिक्षण, घरखर्च, कर्जफेड, आरोग्याचा खर्च आणि पुढील हंगामाची तयारी या सर्व आशा त्या पिकाशी जोडलेल्या आहेत. त्यामुळे पावसाची दडी ही केवळ हवामानाची घटना नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी गंभीर इशारा आहे. पाऊस येईल आणि परिस्थिती सुधारेल, अशी आशा प्रत्येक शेतकऱ्याला आहे. मात्र आशावादासोबत नियोजन आणि ठोस उपाययोजनांचीही गरज आहे. संकटाच्या काळात शेतकऱ्याच्या पाठीशी शासन, प्रशासन, सहकारी संस्था आणि समाज उभा राहिला तरच ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधार मिळेल.

शेतकरी सुखी तर गाव समृद्ध आणि गाव समृद्ध तर देशाची अर्थव्यवस्था मजबूत. त्यामुळे आभाळाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्याला केवळ पावसाची नव्हे, तर शासनाच्या ठोस आधाराचीही गरज आहे.

✻ जन्मदिन विशेष

# मदर तेरेसा : मानवसेवेची मूर्तिमंत प्रेरणा

प्रेमानवतेची सेवा हीच खरी ईश्वरसेवा मानून आपले संपूर्ण आयुष्य गरिब, निराधार, आजारी आणि वंचितांच्या सेवेसाठी समर्पित करणाऱ्या मदर तेरेसा यांचे नाव जगाच्या इतिहासात अत्यंत आदराने घेतले जाते. प्रेम, करुणा, त्याग आणि सेवाभाव यांचा आदर्श त्यांनी आपल्या कार्यातून संपूर्ण जगासमोर ठेवला. समाजातील सर्वात दुर्बल व्यक्तीच्या चेहऱ्यावर हास्य आणणे हेच आपल्या जीवनाचे ध्येय त्यांनी मानले.

मदर तेरेसा यांचा जन्म २६ ऑगस्ट १९१० रोजी स्कोप्जे येथे झाला. त्यांचे मूळ नाव ॲग्नेस गोंझा बोयाज्यू होते. लहानपणापासूनच त्यांच्यामध्ये धार्मिक वृत्ती आणि गरजू लोकांबद्दल करुणा होती. वयाच्या तरुणपणी त्यांनी सेवाकार्याचा मार्ग स्वीकारला आणि पुढे भारतात येण्याचा निर्णय घेतला.

१९२९ मध्ये त्या भारतात आल्या. सुरुवातीला त्यांनी कोलकाता येथील सेंट मेरी स्कूलमध्ये शिक्षिका म्हणून काम केले. विद्यार्थ्यांना शिकवित असतानाच त्यांना शहरातील गरिबी, उपासमार आणि वंचितांचे जीवन जवळून पाहायला मिळाले. या अनुभवाने त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला.

१९४६ मध्ये त्यांना ‘आतील हाक’ जाणवली, असे त्यांनी स्वतः सांगितले. त्यानंतर त्यांनी शाळेतील तुलनेने सुरक्षित जीवन सोडून गरिबांच्या सेवेत पूर्णपणे झोकून देण्याचा निर्णय घेतला. त्यांनी कोलकात्याच्या झोपडपट्ट्यांमध्ये जाऊन गरजू लोकांची सेवा सुरू केली. त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू होताङ्कज्यांना समाजाने नाकारले आहे, त्यांच्यापर्यंत प्रेम आणि आधार पोहोचवणे.

**मिशनरीज ऑफ चॅरिटीची स्थापना**

१९५० मध्ये ‘चळीीळेपरीळशी `ष उहरीळीं’ या संस्थेला मान्यता मिळाली. या संस्थेच्या माध्यमातून अनाथ, निराधार, आजारी, बेघर आणि मृत्यूच्या दारात असलेल्या व्यक्तींसाठी सेवा कार्य सुरू झाले. पुढे ही चळवळ भारतापुरती मर्यादित न राहता जगातील अनेक देशांमध्ये पोहोचली.

कोलकात्यातील ‘निर्मल हृदय’ हे त्यांच्या सेवाकार्याचे एक प्रसिद्ध केंद्र बनले. रस्त्यावर निराधार अवस्थेत आढळणाऱ्या व्यक्तींना तेथे आश्रय, अन्न, औषधोपचार आणि माणुसकीचा आधार दिला जात असे.



त्यांच्या कार्याची सर्वात मोठी वैशिष्ट्ये म्हणजे त्यांनी गरिबांकडे दयेच्या नजरेने नव्हे, तर माणूस म्हणून पाहिले.

नोबेल शांतता पुरस्कार

मदर तेरेसा यांच्या मानवतावादी कार्याची दखल जगाने घेतली. १९७९ मध्ये त्यांना नोबेल शांतता पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार स्वीकारताना त्यांनी गरिबी, उपेक्षा आणि मानवतेच्या प्रश्नांकडे जगाचे लक्ष वेधले. पुरस्कारातून मिळणारी रक्कमही त्यांनी गरजूंच्या सेवेसाठी वापरण्याचा निर्णय घेतला.

भारत सरकारने त्यांच्या महान सेवाभावी कार्याचा गौरव करत १९८० मध्ये त्यांना ‘भारतरत्न’ हा देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान केला.

**सेवाभावाचा आदर्श**

मदर तेरेसा यांच्यासाठी सेवा म्हणजे केवळ अन्न किंवा औषध देणे नव्हते. एखाद्या व्यक्तीला प्रेमाने जवळ घेणे, त्याचे दुःख ऐकून घेणे आणि त्याला समाजात आपले स्थान असल्याची जाणीव करून देणे, हीदेखील त्यांच्यासाठी सेवा होती.

त्यांच्या कार्यामुळे जगभरातील असंख्य लोकांना सामाजिक सेवेकडे वळण्याची प्रेरणा मिळाली. त्यांच्या संस्थेतील सेविका आणि स्वयंसेवकांनी विविध देशांमध्ये रुग्णालये, अनाथालये, आश्रयगृहे आणि सेवाकेंद्रे उभारून मानवतेची सेवा केली.

**टीका आणि वाद**

मदर तेरेसा यांचे कार्य जगभर प्रसिद्ध झाले असले तरी त्यांच्या कार्यपद्धतीवर काही टीकाही झाली. त्यांच्या संस्थांमधील वैद्यकीय सुविधा, निधीचे स्रोत आणि काही सामाजिक-धार्मिक भूमिकांबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाकडे पाहताना त्यांच्या कार्याचा गौरव करण्याबरोबरच त्यांच्यावरील टीका आणि वादांचाही वस्तुनिष्ठ विचार केला जातो.

तरीही गरिब, निराधार आणि समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या लोकांसाठी त्यांनी निर्माण केलेली सेवा-चळवळ ही आधुनिक मानवतावादी कार्याच्या इतिहासातील महत्त्वाची घटना मानली जाते.

**प्रेरणादायी वारसा**


५ सप्टेंबर १९९७ रोजी कोलकाता येथे मदर तेरेसा यांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतरही त्यांचे सेवाकार्य थांबले नाही. त्यांच्या संस्थेच्या माध्यमातून विविध देशांमध्ये सेवा सुरू राहिली.

मदर तेरेसा यांच्या जीवनाचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहेङ्कसमाजातील शेवटच्या घटकापर्यंत माणुसकी पोहोचली पाहिजे. मोठे कार्य करण्यासाठी नेहमी मोठी साधनेच आवश्यक असतात असे नाही; एका गरजू व्यक्तीला मदतीचा हात देणे, दुःखी व्यक्तीचे अश्रू पुसणे आणि उपाशी व्यक्तीला अन्न देणे यातूनही मानवतेची सुरुवात होऊ शकते.

मदर तेरेसा यांचे जीवन आपल्याला सांगते की, यश केवळ संपत्ती, प्रसिद्धी किंवा पदामध्ये नसते; दुसऱ्याच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करण्यातही खरे यश दडलेले असते. म्हणूनच त्यांचे जीवन मानवसेवेची प्रेरणादायी गाथा म्हणून सदैव स्मरणात राहील.

# अँटोईन लावॉझिए : आधुनिक रसायनशास्त्राचे जनक

विज्ञानाच्या इतिहासात काही व्यक्तींनी आपल्या संशोधनामुळे संपूर्ण शास्त्राची दिशा बदलून टाकली. फ्रेंच शास्त्रज्ञ अँटोईन लावॉझिए हे त्यापैकीच एक. त्यांना आधुनिक रसायनशास्त्राच्या पायाभरणीतील सर्वात महत्त्वाच्या शास्त्रज्ञांपैकी एक मानले जाते. रसायनशास्त्राला अंदाज, जुन्या समजुती आणि अल्केमीच्या प्रभावातून बाहेर काढून मोजमाप, प्रयोग आणि वैज्ञानिक नियमांच्या आधारावर उभे करण्याचे मोठे श्रेय लावॉझिए यांना दिले जाते.



बालपण आणि शिक्षण


अँटोईन लॉराँ लावॉझिए यांचा जन्म २६ ऑगस्ट १७४३ रोजी पॅरिस, फ्रान्स येथे एका सधन कुटुंबात झाला. त्यांचे वडील कायद्याच्या क्षेत्रात होते. लावॉझिए यांनी पॅरिसमध्ये उच्च शिक्षण घेतले. सुरुवातीला त्यांनी कायद्याचे शिक्षण घेतले; मात्र त्यांची खरी आवड विज्ञानात होती.

गणित, खगोलशास्त्र, वनस्पतिशास्त्र, भूविज्ञान आणि रसायनशास्त्र अशा विविध विषयांचा त्यांनी अभ्यास केला. विज्ञानाकडे पाहण्याची त्यांची पद्धत अत्यंत शिस्तबद्ध होती. एखाद्या सिद्धांतावर विश्वास ठेवण्यापूर्वी त्याची प्रयोगाद्वारे आणि अचूक मोजमापाद्वारे पडताळणी करणे, हा त्यांच्या संशोधनाचा मूलमंत्र होता.

रसायनशास्त्रात क्रांतिकारी बदल

लावॉझिए यांच्या काळात रसायनशास्त्रात अनेक चुकीच्या किंवा अपुऱ्या संकल्पना प्रचलित होत्या. त्यापैकी ‘फ्लॉजिस्टन सिद्धांत’ विशेष महत्त्वाचा होता. ज्वलनाच्या प्रक्रियेत पदार्थातून एक विशिष्ट घटक बाहेर पडतो, अशी त्या काळातील धारणा होती.

लावॉझिए यांनी काळजीपूर्वक प्रयोग करून या संकल्पनेला आव्हान दिले. ज्वलनाच्या प्रक्रियेत हवेतील एका विशिष्ट घटकाचा सहभाग असतो, हे त्यांनी स्पष्ट केले. पुढे त्या घटकाला ऑक्सिजन असे नाव देण्यात आले.



त्यांच्या प्रयोगांमुळे ज्वलन, श्वसन आणि पदार्थांच्या रासायनिक अभिक्रिया यांचे स्वरूप समजून घेण्यास नवी दिशा मिळाली.

वस्तुमान अक्षयतेचा नियम

लावॉझिए यांचे सर्वात प्रसिद्ध योगदान म्हणजे वस्तुमान अक्षयतेचा नियम याला प्रयोगात्मक आधार देणे.

या नियमानुसार, रासायनिक अभिक्रियेत पदार्थ निर्माण होत नाही किंवा नष्ट होत नाही; अभिक्रियेपूर्वी असलेले एकूण वस्तुमान आणि अभिक्रियेनंतर निर्माण झालेल्या पदार्थांचे एकूण वस्तुमान समान राहते. त्यांनी रासायनिक अभिक्रियांचे अत्यंत अचूक मोजमाप करून या तत्त्वाला बळकटी दिली. त्यामुळे रसायनशास्त्रात परिमाणात्मक प्रयोगांना मोठे महत्त्व प्राप्त झाले.

पाण्याचे स्वरूप स्पष्ट केले

लावॉझिए यांनी पाणी हे एक मूलद्रव्य नसून हायड्रोजन आणि ऑक्सिजनपासून बनलेले संयुग असल्याचे सिद्ध करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण काम केले. त्यांच्या प्रयोगांनी पदार्थांचे विघटन आणि पुन्हा संयोजन यांचा अभ्यास अधिक शास्त्रीय पद्धतीने करण्याचा मार्ग मोकळा केला.

रासायनिक नामकरणात मोठे योगदान

रसायनशास्त्रातील विविध पदार्थांना वेगवेगळी आणि अनेकदा गोंधळ निर्माण करणारी नावे होती. लावॉझिए आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी १७८७ मध्ये रासायनिक नामकरणाची अधिक शिस्तबद्ध पद्धत विकसित करण्यास हातभार लावला.

त्यामुळे रासायनिक पदार्थांची नावे त्यांच्या रासायनिक स्वरूपाशी अधिक व्यवस्थितपणे जोडली जाऊ लागली. आधुनिक रासायनिक नामकरणाच्या विकासात या कार्याचे मोठे महत्त्व आहे.

रसायनशास्त्राला प्रयोगशाळेची शिस्त

लावॉझिए यांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी रसायनशास्त्राला केवळ गुणात्मक निरीक्षणांपुरते मर्यादित ठेवले नाही. वजन, मोजमाप, प्रयोग, निरीक्षण आणि गणना यांना त्यांनी रसायनशास्त्राच्या केंद्रस्थानी आणले. यामुळे रसायनशास्त्र हे तर्क आणि प्रयोगांच्या आधारावर तपासता येणारे शास्त्र बनले. म्हणूनच त्यांना आधुनिक रसायनशास्त्राच्या विकासातील प्रमुख व्यक्तिमत्त्व मानले जाते.

पत्नी मेरी-ॲनचा महत्त्वाचा सहभाग

लावॉझिए यांच्या वैज्ञानिक कार्यात त्यांच्या पत्नी मेरी-ॲन पॉल्झ लावॉझिए यांचेही महत्त्वपूर्ण योगदान होते. त्यांनी वैज्ञानिक लेखन, प्रयोगांचे दस्तऐवजीकरण आणि वैज्ञानिक चित्रण यामध्ये मदत केली. परदेशी वैज्ञानिकांचे संशोधन समजून घेण्यासाठी भाषांतर करण्याचे कामही त्यांनी केले.

लावॉझिए यांच्या प्रयोगशाळेतील वैज्ञानिक कामकाज अधिक व्यवस्थित नोंदवून ठेवण्यात मेरी-ॲनची भूमिका महत्त्वाची होती.

फ्रेंच राज्यक्रांती आणि दुर्दैवी अंत

लावॉझिए हे केवळ वैज्ञानिक नव्हते; त्यांनी फ्रान्समधील करव्यवस्थेशी संबंधित संस्थेतही काम केले होते. फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळात या भूमिकेमुळे त्यांच्यावर टीका झाली. १७९४ मध्ये त्यांच्यावर खटला चालवण्यात आला आणि ८ मे १७९४ रोजी पॅरिसमध्ये त्यांना गिलोटिनद्वारे मृत्युदंड देण्यात आला. त्यांचे वय त्यावेळी अवघे ५० वर्षे होते.

त्यांच्या मृत्यूमुळे विज्ञानविश्वाला मोठा धक्का बसला. मात्र त्यांचे वैज्ञानिक विचार आणि संशोधन पुढील पिढ्यांसाठी अमूल्य ठरले.

अमर वैज्ञानिक वारसा

लावॉझिए यांनी रसायनशास्त्राला आधुनिक वैज्ञानिक पद्धतीची भक्कम पायाभरणी करून दिली. ऑक्सिजनच्या भूमिकेचा अभ्यास, वस्तुमान अक्षयतेचा नियम, रासायनिक नामकरणातील सुधारणा आणि अचूक मोजमापावर आधारित प्रयोगपद्धती यामुळे रसायनशास्त्राच्या विकासाला नवे वळण मिळाले.

आज शाळेपासून विद्यापीठापर्यंत रसायनशास्त्र शिकताना ज्या मूलभूत संकल्पनांचा अभ्यास केला जातो, त्यांच्या विकासामध्ये लावॉझिए यांच्या कार्याचा मोठा वाटा आहे.

अँटोईन लावॉझिए यांचे जीवन आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतेङ्कप्रचलित समजुतींना केवळ स्वीकारण्याऐवजी प्रश्न विचारणे, प्रयोग करणे आणि पुराव्याच्या आधारे सत्य शोधणे हेच खऱ्या विज्ञानाचे लक्षण आहे. त्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनामुळे रसायनशास्त्राला नवी ओळख मिळाली आणि म्हणूनच ते इतिहासात ‘आधुनिक रसायनशास्त्राचे जनक’ म्हणून अमर झाले.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# वाहनधारकांना कराचा भरणा करण्याचे आवाहन

**(प्रतिनीधी वरुड दर्पण)**

***वर्धा*** – भारत (बीएच) मालिकेमध्ये नोंदणीकृत झालेल्या वाहनाचा कर दोन वर्षासाठी घेतला जातो. त्यानंतर या कालावधीनंतर वाहन मालक वाहनाचा कर वेळेत भरत नाहीत. अशा वाहनधारकांनी अतिरिक्त शुल्क टाळण्यासाठी वेळेत कर भरणे करणे आवश्यक आहे.

दोन वर्षानंतर वाहनधारकांनी कर वेळेत न भरल्यामुळे प्रतिदिन १०० रुपये एवढे अतिरिक्त शुल्क लागू आहे. त्यामुळे भारत मालिकेमध्ये नोंदणीकृत झालेल्या वाहन मालकांनी कर वेळेत भरणे आवश्यक आहे. रस्ते वाहतुक आणि महामार्ग मंत्रालयाच्या अधिसुचनेनुसार भारत (बीएच) मालिकेमध्ये वाहने नोंदणीकृत करण्यासाठी अधिसुचना जारी केली होती. सदर अधिसुचनेनुसार भारत मालिकेमध्ये नोंदणीकृत झालेल्या वाहनांचा कर हा दोन वर्षासाठी घेतला जातो. असे सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी कळविले आहे.

# राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठाणाच्या विविध योजनांसाठी ३१ ऑगस्टपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**(प्रतिनीधी वरुड दर्पण)**

***अमरावती*** – भारत सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत कार्यरत राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठाण, कोलकाता यांच्या समान व असमान निधी योजनांतर्गत सन २०२६-२७ साठी शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. इच्छुक ग्रंथालयांनी आवश्यक कागदपत्रांसह विहित नमुन्यातील प्रस्ताव संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे दि. ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन प्र. ग्रंथालय संचालक अशोक मा. गाडेकर यांनी केले आहे.

ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या माध्यमातून राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध अर्थसहाय्य योजना राबविण्यात येतात. या योजनांचे नियम, अटी तसेच अर्जाचा नमुना राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठाणाच्या www.rrrlf.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून इच्छुक ग्रंथालयांनी तेथून अर्ज डाउनलोड करून भरावेत.

सन २०२६-२७ साठी समान निधी योजनेअंतर्गत इमारत बांधकाम व विस्तारासाठी कमाल २५ लाख रुपये अर्थसहाय्य उपलब्ध आहे. या योजनेव्यतिरिक्त इतर समान निधी योजनांचा लाभ केंद्रीय पद्धतीने देण्यात येणार असल्याने त्या योजनांसाठी प्रस्ताव सादर करू नयेत, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. असमान निधी योजनांमध्ये ग्रंथालय सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना ग्रंथ, साधनसामग्री, फर्निचर खरेदीसाठी ४ लाख रुपये तसेच इमारत बांधकामासाठी १० ते १५ लाख रुपये अर्थसहाय्य उपलब्ध आहे. तसेच 'ज्ञान कोपरा' विकसित करण्यासाठी २.५० लाख रुपये व विशेष आधुनिकीकरणासाठी २ लाख रुपये अर्थसहाय्य दिले जाणार आहे. याशिवाय ग्रंथालयांच्या ५०, ६०, ७५, १००, १२५ आणि १५० व्या महोत्सवी वर्षानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यासाठी ६.२० लाख रुपये तसेच इमारत विस्तारासाठी १० लाख रुपये अर्थसहाय्य उपलब्ध आहे. वरील योजनांपैकी कोणत्याही एका योजनेसाठी इच्छुक ग्रंथालयांनी आवश्यक कागदपत्रांसह इंग्रजी किंवा हिंदी भाषेत प्रस्ताव चार प्रतींमध्ये संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे दि. ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# हयात प्रमाणपत्रासाठी लाभार्थ्यांना ॲप सुविधा

**(प्रतिनीधी वरुड दर्पण)**

***वर्धा*** – लाभार्थ्यांना हयातीचे प्रमाणपत्र मोबाईल ॲपद्वारे सादर करता यावे याकरीता बेनेफिसरी सत्यापण ॲप ही ऑनलाईन प्रणाली विकसित केली आहे. राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील लाभार्थ्यांनी हयात प्रमाणपत्र सादर करण्यासाठी या ॲपचा वापर करुन डिजीटल हयात प्रमाणपत्र सादर करावे, असे आवाहन देवळीचे तहसिलदार समर्थ क्षिरसागर यांनी केले आहे. राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य योजनेतील वृध्द, विधवा, घटस्फोटीत महिला, परित्यक्या, अनाथ, अपंग, दुर्धर आजाराने ग्रस्त व्यक्ती इत्यादी लाभार्थ्यांना हयात प्रमाणपत्र सादर करावे लागतात. पात्र लाभार्थ्यांना मोबाईल मार्फत अथवा गावपातळीवरील ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक, ग्रामपंचायत मधील संगणक परिचालक व कर्मचारी यांच्या मार्फत अथवा हयात प्रमाणपत्र सादर करता येणार आहे. ही सेवा लाभार्थ्यांना वापरण्यास नि:शुल्क आहे. तथापि लाभार्थ्यांनी आपले सेवा केंद्रामार्फत घेतल्यास ५० रुपये शुल्क आकारण्यात येईल. यासाठी लाभार्थ्यांनी ॲप प्रणालीचा वापर करून आपले हयात प्रमाणपत्र ऑनलाईन पध्दतीने तयार करुन त्यासह श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी वृध्दपकाळ निवृत्ती वेतन योजनेतील लाभार्थ्यांनी आपले अद्यावत आधारकार्ड, बँक खाते पासबुक ची छायांकीत प्रत तसेच संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांनी आपले अद्यावत आधारकार्ड, बँक खाते पासबुक ची छायांकीत प्रत व चालु वर्षाचे उत्पन्न प्रमाणपत्र, अपंग असल्यास अपंग प्रमाणपत्र, अद्यावत यू.डॉ.आय.डी. कार्ड इत्यादी तहसिल कार्यालयातील संजय गांधी निराधार योजना शाखेत सादर करावे, असे देवळीच्या तहसिलदारांनी कळिवले आहे.

# गुणनियंत्रण विश्लेषणात जिल्ह्यातील सोयाबीन बियाण्यांचे १८९ नमुने अप्रमाणित

## कंपनी विरोधात एफआयआर दाखल

**(प्रतिनीधी वरुड दर्पण)**

***अमरावती*** – सोयाबीन बियाण्यांच्या विश्लेषणासाठी जिल्ह्यातील ४६४ नमुन्यांपैकी ३८५ नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्राप्त झाले असून १७ ऑगस्ट पर्यंत यातील १८९ नमुने अप्रमाणित आढळे आहेत. यासंदर्भात बियाणे उत्पादक कंपनीवर कार्यवाही करण्यात येत असल्याचे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी सांगितले.

सोयाबीन बियाण्यांच्या एकूण ३ हजार १५७ प्राप्त तक्रारींपैकी २ हजार ३२६ तक्रारी छत्रपती संभाजीनगर येथील बुस्टर प्लांट जेनेटिक्स कंपनीच्या असून अमरावतीच्या गाडगेनगर पोलीस स्टेशनमध्ये कंपनी विरुद्ध फौजदारी गुन्हा नोंदवण्यात आल्याचेही सांगण्यात आले आहे.

विविध कंपन्यांचे सोयाबीन बियाणे उगवले नसल्याबाबत शेतकऱ्यांच्या तक्रारी तसेच कंपन्यांवर कार्यवाही करण्याविषयी वृत्तपत्रांमध्ये विविध वृत्त प्रसारित झाले होते. याची कृषी विभागाने गंभीर दखल घेत जिल्ह्यात पुरवठा झालेल्या सोयाबीन बियाण्यांचे वितरकनिहाय,वाणनिहाय, लॉट निहाय माहिती आदी सादर करण्याचे आदेश बियाणे उत्पादक कंपन्यांना देण्यात आले. शेतकऱ्यांच्या तक्रारींची पाहणी विहित वेळेत होण्यासाठी तालुकास्तरीय तक्रार निवारण समिती गठित करण्यात आल्या. या समित्यांमार्फत प्रातिनिधिक स्वरुपात कंपनीनिहाय आणि लॉटनिहाय तक्रारींची पाहणी सुरु असून उर्वरीत तक्रारींची पाहणी उपसमित्यांद्वारे करण्यात येत आहे. १७ ऑगस्ट पर्यंत घेतलेल्या जिल्ह्यातील ४६४ नमुन्यांपैकी ३८५ नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्राप्त झाले असून यातील १९६ नमुने प्रमाणित तर १८९ नमुने अप्रमाणि आढळे आहेत. बियाणे उत्पादक कंपन्यांवर बियाणे कंपनी कायदा १९६६ आणि बियाणे अधिनियम १९६८ अंतर्गत कायदेशिर कार्यवाही करण्यात येत आहे.

एकूण प्राप्त झालेल्या ३ हजार १५७ तक्रारींपैकी २ हजार ३२६ तक्रारी छत्रपती संभाजीनगर येथील बुस्टर प्लांट जेनेटिक्स कंपनीच्या असून अमरावतीच्या गाडगेनगर पोलीस स्टेशनमध्ये ११ ऑगस्ट २०२६ रोजी कंपनी विरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्ह्यातील ज्या तालुक्यांमध्ये येथील बुस्टर प्लांट जेनेटिक्स कंपनी व इतर कंपनींविरुद्ध एकूण ४१ फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. बुस्टर प्लांट जेनेटिक्स कंपनी विरुद्ध १० गुन्हे तर ईनोव्हेज ॲग्रो,इंदोर कंपनीवर ५, पार्श्व जेनेटीक्स, इंदोर कंपनीवर ५, श्री. सिड्स, खंडवा कंपनी २, ग्रिन गोल्ड ॲग्रीटेक १, रवि सिड्स ७, एस. के. बी सिड्स २, ग्रिन ॲग्री रिव्होल्युशन २, व्हिगर बायोटेक २, अंकुर सिंड्स २, ईगल सिड्स १, श्री. ओसवाल सिड्स १ आणि उत्तम सिड्सवर १ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या सर्व गुन्ह्यांमध्ये पोलीस विभागाकडून तपास सुरु आहे.

सोयाबीन बियाण्यांच्या तालुका स्तरावर प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने १७ ऑगस?ट २०२६ पर्यंत ईनोव्हेज ॲग्रो,इंदोर कंपनीच्या २७३, पार्श्व जेनेटीक्स, इंदोर कंपनीच्या ११९, श्री. सिड्स, खंडवा कंपनी १०३, ग्रिन गोल्ड ॲग्रीटेक कंपनीच्या ६७१, रवि सिड्स कंपनीच्या १८२, एस. के. बी सिड्सच्या ४५ तक्रारी प्राप्त झाल्या असून या कंपन्यांचे बियाणे विक्री परवान्यांवर बियाणे कंपनी कायदा १९६६ आणि बियाणे अधिनियम १९६८ अंतर्गत कायदेशिर कार्यवाही करण्याचा प्रस्ताव निविष्ठा व गुण नियंत्रक संचालकांकडे पाठविण्यात आला आहे.

## महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालयात

# वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने पर्यावरणपूरक राखी निर्मिती स्पर्धा

**(प्रतिनीधी वरुड दर्पण)**



**वरुड** – शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय येथील वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने पर्यावरणपूरक राखी निर्मिती स्पर्धेचे आयोजन नुकतेच करण्यात आले.

कार्यक्रमास प्राचार्य डॉ.दिलीप हांडे यांचे मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ.एस.व्ही.सातपुते, डॉ.एम.बी.बोबडे, डॉ.प्रांजली देशमुख, प्रा.शुभम साखरे, परीक्षक डॉ.रीना बाकाले, प्रा.अम्रपाली पाटील, शिक्षकेत्तर कर्मचारी सरजू इंगळे, एन.एस.पाटील उपस्थित होते. पर्यावरण संवर्धनाचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे तसेच विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व कल्पकतेला प्रोत्साहन देणे, हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता. विद्यार्थ्यांनी निसर्गातील विविध प्रकारचे फुले,धान्य, कापूस, ताग (ज्यूट), बिया तसेच इतर नैसर्गिक व पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करुन आकर्षक राख्या तयार केल्या होत्या. पारंपरिक साहित्याऐवजी नैसर्गिक घटकांचा सर्जनशील वापर करुन विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक राखी निर्मितीचा सुंदर संदेश दिला. या स्पर्धेत एकूण २७ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध रंगीबेरंगी व आकर्षक राख्यांनी कार्यक्रमाची शोभा वाढविली. मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पर्यावरणपूरक राख्यांचे कौतुक करुन नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार करण्याचे आवाहन केले. या उपक्रमातून पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, हा संदेश देण्यात आला.

# न्या.शुक्रे यांनी घेतली महाराष्ट्र लोकायुक्त अध्यक्षपदाची पदाची शपथ

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेसह अनेकांची उपस्थिती

**(प्रतिनीधी वरुड दर्पण)**



**मुंबई** – मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांनी राज्याच्या लोकायुक्त संस्थेच्या अध्यक्ष पदाची शपथ घेतली.

लोकभवन मुंबई येथे झालेल्या एका छोटेखानी शपथविधी सोहळ्यात राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी न्या. सुनील शुक्रे यांना पदाची शपथ दिली. न्या. शुक्रे यांची नियुक्ती २०२३ च्या नव्या महाराष्ट्र लोकायुक्त कायद्यानुसार करण्यात आली असून ही नियुक्ती पाच वर्षांसाठी किंवा ते वयाची ७० वर्षे पूर्ण करेपर्यंत, यापैकी जे अगोदर असेल, त्या दिवशीपर्यंत असेल. शपथविधी सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, विधानसभा सदस्य भास्कर जाधव, मावळते लोकायुक्त न्या. विद्यासागर कानडे, गोवा राज्याचे लोकायुक्त न्यायमूर्ती संदीप शिंदे, राज्याचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे, महाराष्ट्र लोकायुक्त संस्थेचे अन्य सदस्य तसेच मुख्य सचिव राजेश अग्रवाल उपस्थित होते.

## न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश प्राइमरी स्कूल येथे

# शिक्षक पालक सभा उत्साहात



**(प्रतिनीधी वरुड दर्पण)**

**वरुड** – गुरुसेवा शैक्षणिक विकास संस्थांतर्गत येणाऱ्या लोणी येथील न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश प्राइमरी स्कूल लोणी येथे शिक्षक पालक सभा उत्साहात पार पडली.

पालक सभा ही तीन टप्प्यांमध्ये घेण्यात आली. प्री प्रायमरी विभाग पहिल्या टप्प्यात, वर्ग एक व दोन दुसऱ्या टप्प्यात आणि वर्ग तिसरा, चौथा तिसरा टप्प्यात अशा प्रकारे सभा घेण्यात आली.

त्यामुळे शिक्षक आणि पालक यांच्यामधील संवाद हा व्यवस्थित होऊ शकला. सभेची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. या सभेमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकास, शाळेतील आणि घरी लाभणाऱ्या शैक्षणिक वातावरण, विद्यार्थ्यांना असणारी शाळेची ओढ अथवा भीती शिक्षकांच्या विद्यार्थ्यांबाबतीत समस्या तसेच विद्यार्थ्यांच्या शिक्षक आणि शाळेतील विविध समस्या याबद्दल सविस्तर चर्चा करण्यात आली. आलेल्या समस्यांचे निराकरण करण्यात आले आणि भविष्यात येणाऱ्य समस्या उदभवु नये, यासाठी उपाययोजनेचे नियोजन करण्यात आले. सभेला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता. संस्थाध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, मुख्याध्यापिका आणि सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.

### सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -९६१०८१० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने - ९४,७०० रु.(१०ग्रॅम)

चांदी - १,३०,००० रु. (प्र.किलो)

### कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

**बाजारभाव ( क्विंटलमध्ये )**

| | | |
|---|---|---|
| ज्वारी - | १६५० - | २००० |
| गहू - | २५०० - | ३००० |
| तूर - | ६१०० - | ६३९० |
| मूग - | ६५०० - | ७००० |
| उडीद - | ६००० - | ७००० |
| हरभरा - | ५६०० - | ५९०० |
| सोयाबिन - | ४१०० - | ४३५० |
| बाजरा - | २००० - | २३०० |
| तिळ - | ८२०० - | ९३०० |
| भुईमूग - | ५१५० - | ५३५० |
| मका - | २२०० - | २३०० |

## तालुका विधी सेवा समिती वरुड अंतर्गत

# राष्ट्रीय जेष्ठ नागरीक दिन निमित्ताने जेष्ठ नागरिक कायद्याविषयी जनजागृती

**(प्रतिनीधी वरुड दर्पण)**



**वरुड** – तालुका विधी सेवा समिती वरुड अंतर्गत 'राष्ट्रीय जेष्ठ नागरीक दिन' जिल्हा न्यायालय-१ येथे जेष्ठ नागरीक कायद्याविषयी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी जिल्हा न्यायाधीश-१ तथा अति. सत्र न्यायाधीश ए.ए.पंचभाई होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन तालुका वकील संघाचे सदस्य ॲड.व्ही.बी.भोसे, ॲड.वाय.एन.नागले, ॲड.व्ही.जे.मिरगे यांचे प्रमुख उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला. प्रमुख वक्ते ॲड.व्ही.बी.भोसे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना आईवडीलांवर शारिरीक व मानसिक अत्याचार करतात त्यामुळे त्यांना वृध्दाश्रमात जावे लागते, त्यामुळे या गोष्टींची दखल घेवून सन २००७ मध्ये हा कायदा अस्तित्वात आला. त्यांनी पुढे या कायद्याविषयी सखोल माहिती देवुन जेष्ठ नागरीकांनी याचा कसा लाभ घ्यावा? याबाबत सविस्तर माहीती दिली तसेच सरकारने कमीत कमी जिल्हयाच्या ठिकाणी जेष्ठ नागरिकांकरीता किमान एक वृध्दाश्रम काढण्याची गरज असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष ए.ए.यांनी आईवडीलांची देखभालीची जबाबदारी ही आपलीच असते, आपल्याला वृध्दाश्रमाची गरजच भासु नये, त्याकरीताच सन २००७ मध्ये हा कायदा बनविण्यात आला. आपण सक्षम पालक तसेच पाल्य बनु या जेणे करुन पालकांना वृध्दाश्रमात जाण्याची गरज भासु नये, असे सांगितले. संचालन ॲड.डी.पी.सदापुरे तर आभार ॲड.व्ही.जे.मिरगे यांनी मानले. कार्यक्रमाला न्यायालयात उपस्थित जेष्ठ नागरीक, पक्षकार, तालुका वकिल संघ तर्फे वकील सदस्य, न्यायालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# अमीत साटम यांच्यासमोरच महापौर अन शिक्षण समिती अध्यक्षांमध्ये जंगी

## मुंबई भाजप अध्यक्षांसमोरच भिडल्या महापौर-शिक्षण समिती अध्यक्षा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – महापालिकेमध्ये भाजपच्या नगरसेवकांमध्ये असलेले अंतर्गत वाद आणि हेवेदावे यावर तोडगा काढण्यात बोलावण्यात आलेल्या बैठकीतच महापौर आणि शिक्षण समिती अध्यक्षांमध्ये वाद झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. महापौर रितू तावडे आणि शिक्षण समिती अध्यक्षा राजेश्री शिरवडकर यांच्यात जुंपल्याची माहिती आहे. या दोन नेत्यांमध्ये मुंबई अध्यक्ष अमीत साटम यांच्यासमोरच खडाजंगी झाल्याने त्याची राजकीय चर्चा जोरदार रंगल्याचं दिसून येतंय.

दरम्यान, अमीत साटम यांनी महापौर रितू तावडे आणि शिक्षण समिती अध्यक्षा राजेश्री शिरवडकर यांना समज दिल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली. महापालिकेत एकमेकांशी स्पर्धा न करता काम करण्याच्या सूचना साटम यांनी दिल्याची माहिती आहे.

**अमीत साटम यांच्या सूचना**

मुंबईकरांनी आपल्याला चांगलं काम करण्यासाठी निवडून दिलं आहे. त्यामुळे स्वतःचे हेवेदावे बाजूला ठेवून मुंबईकरांसाठी काम करा. पक्षाची प्रतिमा मलीन होईल, असं कोणी कृत्य करू नका, अशा सूचना अमीत साटम यांनी दिल्याची माहिती आहे. मुंबई भाजप अध्यक्ष अमीत साटम यांनी घेतलेल्या नगरसेवकांच्या बैठकीतली इनसाइड स्टोरी एबीपी माझाच्या हाती लागली आहे. सोमवारी मुंबई भाजप कार्यालयात भाजपच्या सर्वच नगरसेवकांना बैठकीसाठी बोलविण्यात आले होते. नगरसेवकांच्या एकत्रित बैठकीच्या आधी भाजप अध्यक्ष अमीत साटम यांनी महापौर रितू तावडे, सभागृह नेते गणेश खणकर, स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे आणि शिक्षण समिती अध्यक्षा राजेश्री शिरवडकर यांच्यासोबत बैठक घेतली.

याच बैठकीत मुंबई महापालिकेत पक्षात सुरू असलेल्या अंतर्गत वादावर चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. सभागृह नेते यांना अंतर्गत वादाबाबत अमीत साटम यांच्याकडून विचारणा करण्यात आली. तसेच सदस्यांच्या मतभेदावर आणि समन्वयाचा अभाव याची कारणे ही विचारण्यात आली.

मुंबईच्या महापौर रितू तावडे यांच्यावर मुंबई अध्यक्ष अमीत साटम यांनी नाराजी व्यक्त केली असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. एकंदरीत महापौरांच्या कामांबाबत मुंबई अध्यक्षांनी प्रश्न उपस्थित केले असल्याचंही कळत आहे. महापौर विविध कारणांमुळे वादात सापडत असल्याने अनेक नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांमध्ये नाराजी आहे. अशातच महापौरांनी 'झारीतील शुक्राचार्य' बोलत अप्रत्यक्षपणे पक्षातील काही जणांवर टीका केली असल्याने यावरही महापौरांना विचारण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले आहे. मागच्या अनेक दिवसांपासून महापौर कोणत्या ना कोणत्या कारणांवरून वादाच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत. त्याची ही कारणे महापौरांना विचारण्यात आली असल्याची माहिती सूत्रांनी दिली.



# ...अखेर पिंगुळीतील मगर जेरबंद : नैसर्गिक अधिवासात सुरक्षित मुक्तता

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**कुडाळ** – कुडाळ तालुक्यातील पिंगुळी येथील तलावात शिरलेल्या मगरीला वनविभागाच्या जलद बचाव पथकाने आणि कर्मचाऱ्यांनी दोन दिवसांच्या अथक प्रयत्नांनंतर सुखरूप जेरबंद केले. पशुवैद्यकीय तपासणीनंतर मगरीला कोणतीही इजा झाली नसल्याचे स्पष्ट झाल्याने तिला तिच्या नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे सोडण्यात आले. तलावात मगर असल्याची माहिती ग्रामस्थांनी वनविभागाला दिली. त्यानंतर वनविभागाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. तलाव खोल असून मोठ्या प्रमाणात पाणी व गाळ असल्याने मगरीला पकडणे आव्हानात्मक ठरले. मड पंपच्या साहाय्याने तलावातील पाणी कमी करण्यात आले.

# लोकायुक्त अध्यक्षपदी न्यायमूर्ती सुनील शुक्रे

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - राज्य मागासवर्ग आयोगाचे माजी अध्यक्ष तथा मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांनी मंगळवारी राज्याच्या लोकायुक्त संस्थेच्या अध्यक्षपदाची शपथ घेतली. लोकभवन येथे झालेल्या एका छोटेखानी शपथविधी सोहळ्यात राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी न्या.शुक्रे यांना पदाची शपथ दिली.

न्या.शुक्रे यांची नियुक्ती २०२३ च्या नव्या महाराष्ट्र लोकायुक्त कायद्यानुसार करण्यात आली असून ती पाच वर्षांसाठी किंवा वयाची ७० वर्षे पूर्ण करेपर्यंत यापैकी जे अगोदर असेल, त्या दिवशीपर्यंत असणार आहे. या शपथविधी सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानसभा अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर, मावळते लोकायुक्त न्या. विद्यासागर कानडे आदी मान्यवर उपस्थित होते. त्यानंतर अमरावती येथील डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयातून एलएलबी पूर्ण केले आणि नागपूर विद्यापीठातून घटनात्मक कायद्यात एल.एल.एम. पदवी मिळवली. न्यायिक सेवेत त्यांनी विविध महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. कोल्हापूर येथे प्रधान जिल्हा न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात रजिस्ट्रार (प्रशासन), महाराष्ट्र न्यायिक अकादमी, उत्तन (ठाणे) येथे सहसंचालक तसेच नागपूर येथे प्रधान जिल्हा न्यायाधीश म्हणून त्यांनी कार्य केले.

# रामगिरी महाराजांना धमक्या देणाऱ्यांना नेस्तनाबूत करू

## अखंड हरिनाम सप्ताहातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा ईशारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अहिल्यानगर** - वारकरी संप्रदायाचा प्रचार आणि प्रसार करणारे अहिल्यानगरच्या सरला बेट येथील श्री संत सद्गुरु योगीराज गंगागिरीजी महाराज यांच्या १७९ व्या अखंड हरिनाम सप्ताहानिमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसह जिल्ह्यातील बड्या नेत्यांची येथे उपस्थिती होती. यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरला बेटाचा विकास आरखडा आणि रामगिरी महाराजांच्या कार्याबद्दल माहिती दिली. तसेच, रामगिरी महाराजांना काही लोक धमक्या देतात, पण त्यांना आम्ही सांगू इच्छितो की, धमक्या देणाऱ्यांना आम्ही नेस्तनाबूत करू, असे म्हणत फडणवीसांनी रामगिरी महाराजांच्या अनुयायांना आश्वस्त केले.



आमच्या मागे ही ताकद होती म्हणुन आम्ही आज सरकारमध्ये आहोत, आमचे सरकार शेतकरी, कष्टकरी यांच्या माध्यमातून काम करतोय. ५६ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा उपक्रम आपण सुरू केला आहे. शेतकरी कर्जमाफी केली, ३६५ दिवस दिवसा आठ तास वीज देतोय. काही लोक आमचे सदगुरु रामगिरी महाराज यांना धमक्या पाठवतात, आम्ही त्यांना नेस्तनाबूत करू, आम्ही येथील कोणाच्याही केसाला हात लावू देणार नाही, अशा शब्दात फडणवीसांनी इशारा दिला. धर्माच्या नावाने कोणी अराजकता करत असेल तर सर्वांच्या पुढे मी असेल, सर्वांनी ज्याच्या त्याच्या धर्माचे काम करावे पण इतर धर्मांचाही आदर करावा, असेही फडणवीसांनी म्हटले. आम्ही मुंबईतून विमानात बसलो तेव्हा मोठा समुद्र दिसत होता, मात्र आज इथे मोठा जनसमुदाय दिसत आहे. सनातन विचार अनेक वर्षांपासून हा संस्कार देत होता तीच संस्कृती, वारसा आजही सुरू आहे. आपल्यावर आक्रमणे झाली त्यातून बदल झाला. मात्र, आमच्या संस्कृतीतवर फरक पडला नाही. आक्रमणामुळे त्यांनी किल्ले जिंकले , मंदिरं तोडली. मात्र, आमची ही वारकरी संप्रदायाची शेकडो वर्षांची परंपरा आजही सुरूच आहे, असे म्हणत देवेंद्र फडणवीसांनी वारकरी संप्रदायाचं महत्त्व सांगितलं. दरम्यान, येथील कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी फुगडी खेळली, तर एकनाथ शिंदेंनी आणि रामगिरी महाराज यांच्यात फुगडीचा खेळ रंगल्याचे पाहायला मिळालं.

**वरुड :** इस्लाम धर्माचे संस्थापक मोहम्मद पैगंबर यांची जयंती ईद–ए–मिलाद म्हणुन संपुर्ण जगभरामध्ये साजरी केली जात असतांना आज वरुड शहरात सुध्दा ईद–ए–मिलाद मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आले.या निमित्ताने वरुड शहरात भव्य शोभायात्रा काढण्यात आली होती. ज्यामध्ये हजारो मुस्लिम बांधव सहभागी झाले होते.





